ePaper

| वर्ष - 6 | अंक - 328 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 17 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## अमृता फडणवीस फसवणूक प्रकरण, आरोपी महिलेला अटक



### आतील पानांत


- अपघातांचे प्रमाण घटले
- "H3N2" चे संकट रोखण्यासाठी प्रशासन 'सतर्क'!
- शेतकऱ्यांच्या लाँगमार्चला यश


# आयुक्तांच्या फर्मानानंतर कर्मचारी 'वठणीवर'!

## जुनी पेन्शन योजना आंदोलन : कामकाज पूर्वपदावर, महापालिकेतील वर्दळ पुन्हा वाढली

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानंतर आज महापालिकेतील कर्मचारी तात्काळ कामावर रुजू झाले आहेत. कामावर रुजू न झाल्यास कर्मचाऱ्यांवर शिस्त भंगाची कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला होता.जुनी पेन्शन योजनेच्या मागणीसाठी सुरु असलेला संप पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर्मचा-यांनी मागे घेतला आहे. पण कामगारांनी काळ्या फिती लावून सकाळपासून कामकाज सुरु केले.




### 2005 नंतरचे कर्मचारीही कामावर हजर

महापालिकेचे सर्व कामकाज बंद झाले होते. दि. 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी महापालिका सेवेत रुजू झालेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे. अशा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तत्काळ कामावर रुजू व्हावे. अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला होता. त्यानुसार पेन्शन लागू असलेले कर्मचारी आज सकाळी कामावर रुजू झाले. त्यानंतर 2005 नंतरचे कर्मचारीही कामावर हजर झाले. त्यामुळे महापालिकेतिल कामकाज पुर्व पदावर सुरु झाले आहे.

आज पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवड महापालिका गजबजलेली पहायला मिळाली.जुनी पेन्शन योजनेसह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्रातुन 18 लाख कर्मचारी संपावर गेले होते. पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी सलग दोन दिवस संप केला. काल मंगळवारी मागण्यांबाबत तोडगा निघाला नसल्याने बुधवारीही बेमुदत संप सुरू होता. पिंपरी चिंचवड महापालिकेत शुकशुकाट होता.

जुनी पेन्शन योजनेच्या मागणीसाठी सुरु असलेल्या संपाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# एचउएनर आजारावर उपचारासाठी सर्व रुग्णालयांत सुविधा उभारा

## आ. अश्विनी जगताप यांची अधिवेशनातून आयुक्तांना सूचना

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवडमध्ये एच३एन२ संसर्गाने एका नागरिकाचा मृत्यू झाल्याचे समोर आल्यानंतर अधिवेशनासाठी मुंबईत असलेल्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह तसेच वैद्यकीय विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी मोबाईलवरून संपर्क करत माहिती घेतली. तसेच या संसर्गाचे प्रमाण वाढू नये यासाठी अधिक दक्षता घेण्याची व सर्व रुग्णालयांमध्ये उपचाराची सक्षम सुविधा उभारण्याची सूचना आयुक्तांना केली. त्याचप्रमाणे त्या अधिवेशनातून तातडीने पिंपरी-चिंचवडकडे रवाना झाल्या असून, महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक नियोजित करण्यात आली आहे.

शहरात एच३एनट२ संसर्गाचा पहिला बळी गेला आहे. एका ७३ वर्षीय वृद्धाचा या संसर्गाने मृत्यू झाल्याचे समोर आहे. त्यानंतर शहरात अधिक काळजी घेण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

या संसर्गावर मात करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत सक्षम यंत्रणा व सुविधा उभारण्याची आवश्यकता आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मुंबईत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातून महापालिका आयुक्त शेखर सिंह



यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधून माहिती घेतली. तसेच वैद्यकीय विभागातील अधिकाऱ्यांसोबतही चर्चा केली.




### आजाराबाबत जनजागृती करावी

त्यांनी शहरात एच३एन२ संसर्ग वाढू नये यासाठी वैद्यकीय आणि आरोग्य विभागाला सतर्क राहण्याचे आदेश दिले. तसेच महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये एच३एन२ संसर्गाच्या रुग्णांवर उपचारासाठी सर्व व्यवस्था उभारण्यास सांगितले. कोणाच्याही आदेशाची वाट न पाहता तातडीने उपचार व्यवस्था निर्माण करण्यास त्यांनी सांगितले. त्याचबरोबर महापालिकेने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी त्यांनी बैठक नियोजित करण्याची सूचनाही आयुक्त शेखर सिंह यांना केली आहे. तसेच या आजाराबाबत नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरू नये यासाठी कोणती काळजी घेण्यात यावी याबाबत जनजागृती करण्यासही त्यांनी आयुक्तांना सांगितले आहे.

# अपघातांचे प्रमाण घटले!

## द्रुतगती व जुन्या मुंबई-पुणे मार्गावर बेशिस्त वाहनचालकांना शिस्त

।पुणे। महाईन्यूज।

**मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे व जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारल्यानंतर वाहनचालकांना शिस्त लागल्याचे दिसून येत आहे. गेल्या दोन महिन्यांत दोन्ही मार्गांवर अपघातांमध्ये ३० टक्क्यांनी, तर त्यामध्ये मृत्यू व जखमी होणाऱ्या व्यक्तींमध्ये ४७ टक्क्यांनी घट झाली असल्याचे दिसून आले आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी परिवहन विभागाने बेशिस्त वाहनचालकांवर एक डिसेंबरपासून कारवाईला सुरुवात केली आहे.**



यासाठी मुंबई, पुणे, पनवेल, पिंपरी-चिंचवड या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांची १२ पथकांकडून कारवाई केली जात आहे. या पथकांकडून वेगाचे उल्लंघन, सीट बेल्ट न घालणे, रस्त्यावर पार्किंग करणे, चुकीच्या पद्धतीने 'लेन कटिंग' करणे, मोबाइल बोलणे, फिटनेस तपासणी न करणे, विरुद्ध दिशेला वाहन लावणे अशा प्रकारच्या कारवाई भर दिला जात आहे.

गेल्या वर्षी जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात द्रुतगती व जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर एकूण ४३ अपघात झाले होते. त्यामध्ये प्राणांतिक अपघातांची संख्या २१ असून, ३१ नागरिकांचा मृत्यू झाला होता. गंभीर स्वरूपाचे १६ अपघात होऊन त्यामध्ये ४१ जण गंभीर जखमी झाले होते. या वर्षी कारवाई सुरू झाल्यानंतर गेल्या दोन महिन्यांत एकूण ३० अपघात झाले होते. त्यामध्ये प्राणांतिक अपघात १४ असून, त्यामध्ये १४ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. गंभीर स्वरूपाचे १३ अपघात झाले असून, त्यामध्ये २२ जण गंभीर जखमी झाल्याचे दिसून आले आहे. गेल्या दोन महिन्यांतील कारवाईमुळे एकूण अपघातांमध्ये मृत्यू व जखमी होण्याचे प्रमाण ४७ टक्क्यांनी घटले आहे. प्राणांतिक अपघात ३३ टक्क्यांनी कमी झाले असून, नागरिकांचे मृत्यू होण्याचे प्रमाण ५५ टक्क्यांनी घटल्याचे दिसून आले आहे.

| जानेवारी व फेब्रुवारी 2022 | 2023 अपघात व मृत्यू माहिती |
|---|---|
| अपघाताचा प्रकार २०२२ | २०२३ |
| प्राणांतिक अपघात २१ | १४ |
| गंभीर अपघात १६ | १३ |
| किरकोळ अपघात ०७ | ०३ |
| एकूण अपघात ४१ | ३० |
| प्राणांतिक अपघातामध्ये मृत्यू ३१ | १४ |
| गंभीर अपघातामध्ये जखमी... ४१ | १२ |
| किरकोळ अपघातामध्ये जखमी ०९ | ०७ |

> गेल्या तीन महिन्यांत द्रुतगती व जुन्या मुंबई-पुणे मार्गावर कारवाईमध्ये राखलेले सातत्य, वाहनचालकांचे सतत केलेले समुपदेशन, वाहनाच्या वेगावर नियंत्रण राखण्याचे प्रयत्न आणि अपघातानंतर तातडीने मदत देण्यासाठी 'आरटीओ' पथकांची मदत होत आहे. त्यामुळे वाहनचालकांनी सुरक्षा मोहिमेस सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळेच अपघात कमी होण्यास मदत झाली आहे. यापुढे घाटातील रात्रीची वाहतूक सुरळीत करणे आणि घाटातील अपघात आणखी कमी करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.
>
> - **भरत कळसकर,** उपायुक्त रस्ता सुरक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य

# पुणे, पिंपरी-चिंचवडमधील नदीलगतच्या जमिनींना मोठा फायदा होणार

## ग्रीनबेल्टचा प्रश्न सुटणार? सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर याबाबत निर्णय होणार

।पुणे। महाईन्यूज।
प्रतिनिधी।

**एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीमध्ये (युडीसीपीआर) ग्रीन बेल्टमध्ये परवानगी असलेल्या बांधकामांना १५ टक्के 'एफएसआय' (चटई क्षेत्र निर्देशांक) वापरण्यास परवानगी देण्याबाबत नगरविकास विभागात चर्चा सुरू आहे. सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर याबाबत निर्णय होणार असल्याचा दावा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी केला. या निर्णयामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नदीलगतच्या जमिनींना मोठा फायदा होणार आहे.**



'यूडीसीपीआर'मध्ये कुठल्या प्रकारची बांधकामे (वापर) असावीत, याबाबत स्पष्टता असली तरी किती टक्के 'एफएसआय' या बांधकामांसाठी अनुज्ञेय असावा, याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे पुणे शहरातील 'ग्रीन बेल्ट'मधील अनेक प्रकल्प गेल्या दोन वर्षांपासून रखडलेले आहेत. महापालिका प्रशासनाने मे २०२१मध्ये याबाबत राज्य सरकारकडे खुलासा मागविला होता. मात्र, त्यावर अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय झालेला नाही. स्थानिकांकडून याबाबत निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी होत असून, येत्या अधिवेशनानंतर त्यावर निर्णय अपेक्षित आहे.

महापालिका प्रशासनाने या प्रकरणी राज्य सरकारला प्रस्ताव पाठविला असून, महापालिकेच्या २०१७च्या विकास आराखड्यानुसार या ठिकाणी १० टक्के 'एफएसआय' वापरण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. सध्याच्या नियमानुसार ओपन स्पेसमध्ये तळमजल्यावर दहा टक्के, तर पहिल्या मजल्यासाठी पाच टक्के 'एफएसआय' वापरण्यास परवानगी आहे. महापालिकेमध्ये १९९७ साली समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये 'रिव्हर प्रोटेक्शन बेल्ट' हे आरक्षण दर्शविलेले आहे. राज्य सरकारच्या आदेशांनुसार रिव्हर प्रोटेक्शन बेल्ट/नाला गार्डन या आरक्षणास 'टीडीआर' अनुज्ञेय असेल, असे निश्चित करण्यात आले आहे. महापालिकेच्या २०१७ च्या मंजूर आराखड्यानुसार स्विमिंग पूल, क्लब हाऊस आदी वापरासाठी १० टक्के 'एफएसआय' वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. 'यूडीसीपीआर'मध्ये जागेता वापर कशासाठी करावा, याबाबत निश्चिती असली तरी त्यासाठी किती 'एफएसआय' असावा याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.

### प्रकल्पांबाबत निर्णय होणार

**पुणे शहराच्या मध्यवस्तीतील डीपी रस्ता, बाणेर, बालेवाडी, खराडी, कल्याणीनगर, मांजरी, मुंढवा, संगमवाडी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पाठीमागचा परिसर या ठिकाणी 'ग्रीन बेल्ट'चे आरक्षण आहे. या ठिकाणचे अनेक प्रकल्प बांधकाम विभागाकडे मंजुरीसाठी असून त्याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. दरम्यान, महापालिका प्रशासनाने २०१७च्या विकास आराखड्यानुसार प्रलंबित असलेल्या प्रकल्पांना दहा टक्के एफएसआय वापरण्यास परवानगी देत हे प्रकल्प मंजूर करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. मात्र, राज्य सरकारकडे याबाबत विचारणा केल्याने या निर्णयानंतरच या प्रकल्पांबाबत निर्णय होणार असल्याचे उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले.**

# "H3N2" चे संकट रोखण्यासाठी प्रशासन 'सतर्क'!

## आ. महेश लांडगे-आयुक्त शेखर सिंह यांची बैठक, पिंपरी-चिंचवड शहरातील आरोग्य यंत्रणेनेबाबत केल्या सूचना

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील H3N2 च्या संसर्गाचे प्रमाण नियंत्रणात ठेवण्यासाठी महापालिका आरोग्य यंत्रणा सतर्क करा. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होता कामा नये, अशा सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी दिल्या आहेत. शहरात H3N2 च्या संसर्गामुळे वृद्ध रुग्णाचा मृत्यू झाला, असे वृत्त कळल्यानंतर आमदार लांडगे मुंबई येथील अधिवेशनातून तातडीने शहरात दाखल झाले. त्यानंतर महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याचीशी सायंकाळी महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफने, स्व. यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाचे 'डीन' डॉ. राजेंद्र वाबळे उपस्थित होते.**

सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफने म्हणाले की, H3N2 चा वाढता संसर्ग रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्या. शहरातील प्रत्येक हॉस्पिटलमध्ये यासाठी १० बेड राखीव ठेवावेत. ऑक्सिजन बेडची व्यवस्था करावी. नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत प्रशासनाने सर्वोत्तम आरोग्य सुविधा द्यावी. तसेच, संबंधित रुग्णाचा मृत्यू कशामुळे झाला? याबाबत नागरिकांमध्ये जागृती करावी, अशा सूचना आमदार लांडगे यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात महापालिका प्रशासनाच्या वतीने उद्या पत्रकार परिषद घेऊन सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

'त्या' रुग्णाचा मृत्यू एकाच वेळी अनेक आजारामुळे!

H3N2 चा संसर्ग झाल्यामुळे एका वृद्ध रुग्णाचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले. त्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र, संबंधित वृद्ध नागरिक यांचे वयोमान आणि एकाचवेळी अनेक व्याधी यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यामुळे मृत्यू झाला आहे. याबाबत अहवाल आल्यानंतर सविस्तर माहिती देणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी. पण, भयभीत होऊ नये, असे आवाहन डॉ. गोफने यांनी केले आहे.



### महापालिका प्रशासनाचे आवाहन...: जगताप

**H3N2 संसर्गाबाबत महापालिका प्रशासनाने राज्य सरकारच्या निर्देशानुसार तयारी केली आहे. प्रत्येक रुग्णालयात राखीव बेड आहेत. प्रसंगी एक रुग्णालय पूर्ण याच उपचारासाठी उपलब्ध केले जाईल. कोविड सारखी परिस्थिती होणार नाही. रुग्ण संख्या वाढल्यास वायसीएमसुद्धा H3N2 च्या उपचारासाठी खुले करण्यात येईल. नागरिकांनी आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. काही लक्षणे दिसल्यास तात्काळ तपासणी करावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. .**

---

# भाजपा महिला मोर्चा भोसरी चऱ्होली मंडलातर्फे "सुषमा स्वराज" पुरस्काराचे वितरण

## महिला मोर्चा सरचिटणीस कविता भोंगाळे- कद्रू यांचा पुढाकार, विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या महिलांचा सत्कार

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपा महिला मोर्चा भोसरी च-होली मंडलाच्या वतीने शहरातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या महिलांना "सुषमा स्वराज पुरस्कार" देवून गौरविण्यात आले. यंदाचा "महिला दिन" सुषमा स्वराज यांना समर्पित करत भाजपा महिला मोर्चा सरचिटणीस कविता भोंगळे- कद्रू आणि भोसरी च-होली मंडलाध्यक्षा गीता महेंद्रु यांच्यावतीने हा कार्यक्रम घेण्यात आला.**

प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या सूचनेनुसार तसेच भाजपा शहराध्यक्ष तथा भोसरी विधानसभा आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली "सुषमा स्वराज पुरस्कार" सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक खेळ व कार्यक्रम पार पडले. प्रास्ताविक महिला मोर्चा सरचिटणीस कविता भोंगळे -कद्रू यांनी केले. त्या म्हणाल्या की, सार्वजनिक जीवनात पुरुषांप्रमाणे महिला देखील आपापल्या क्षेत्रात नावलौकिक मिळवित आहे.

पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांनी आपली क्षमता जगाला दाखवून दिलेली आहे. अशा महिलांना योग्य व्यासपीठ मिळावे, त्यांचा गौरव व्हावा, या उद्देशाने कार्यक्रम घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



### कार्यक्रम यशस्वीततेसाठी यांचे योगदान

**कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून पिंपरी चिंचवड शहर महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा उज्वला गावडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाला भाजपा कामगार आघाडी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजश्री जायभाय, पिंपरी चिंचवड शहर सरचिटणीस दिपाली धनोकार, शहर उपाध्यक्ष रोहिणी मांढरे, उपाध्यक्ष जयश्री खरमाडे, निगडी चिखली मंडलाध्यक्ष कविता हिंगे, सोशल मीडिया प्रमुख हीना मुलानी, भोसरी च-होली मंडल सरचिटणीस सुरेखा पांचाळ, चित्रा अभंग, उपाध्यक्ष कल्पना पाटील, स्वाती शिर्के, मनीषा गंगणे यांच्यासह सर्व मंडल पदाधिकारी, प्रभाग अध्यक्ष, प्रभाग कार्यकारणी सदस्य आदी मान्यवर व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आभार भोसरी च-होरी मंडल अध्यक्षा गीता महेंद्रु यांनी मानले.**

---

# गुणवत्तेच्या जोरावर कामे मिळतात, तडजोडींची गरजच नाही

## अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर हिचे प्रतिपादन



। पिंपरी । महाईन्यूज ।

चित्रपट, नाटक, मालिकांमध्ये गुणवत्तेच्या जोरावर नक्कीच कामे मिळतात. त्यासाठी कोणत्याही चुकीच्या गोष्टी करण्याची आवश्यकता नसते, असे स्पष्ट मत हास्यजत्रा फेम अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर हिने गुरूवारी चिंचवड येथे बोलताना व्यक्त केले.

गुडीपाडव्याच्या मुहर्तावर (२२ मार्च) फुलराणी हा मराठी चित्रपट प्रदर्शित होत आहे. यानिमित्ताने दिशा सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने आकुर्डी व चिंचवड येथील आयोजित कार्यक्रमात प्रियदर्शनी हिने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दिग्दर्शक विश्वास जोशी, माजी महापौर अपर्णा डोके, दिशाचे अध्यक्ष जगन्नाथ (नाना) शिवले, उपाध्यक्ष संतोष बाबर, माजी अध्यक्ष गोरख भालेकर, सचिन साठे, अविनाश ववले, एनआयबीआरच्या प्राचार्या मृदुला गायकवाड, ब्लॉसम शाळेच्या प्राचार्या शारदा भूषण आदी उपस्थित होते. प्रियदर्शनी म्हणाली की, आपल्या मनात नाकारले जाण्याची (रिजेक्शन) भीती असता कामा नये. गुणवत्ता असलीच पाहिजे व त्यासोबत आत्मविश्वासही असला पाहिजे. तुमच्यातील विश्वास दिसला की गुणवत्ताही दिसून येते. चित्रपटसृष्टीतील वाईट अनुभवांविषयी अनेकदा बोलले जाते. पण प्रत्यक्षात मला असा कोणताही अनुभव आला नाही. आपल्या हातात असते की आपण कोणती भूमिका घ्यायची. गुणवत्तेच्या जीवावर कामे मिळतात. तुमच्या गुणवत्तेवर विश्वास ठेवणारी मंडळी आहेत.

## संपादकीय

# पृथ्वीविज्ञानाचे वाढते मोल

***पुढील काळात संशोधनाचा कल वेगवेगळ्या सेन्सर्सद्वारे खडक, माती, पाणी इत्यादींची केवळ उपलब्धताच नव्हे, तर भौतिक आणि रासायनिक गुणधर्माच्या नोंदी, नकाशे व तक्त्यांच्या सहाय्याने आकडेवारीचे पृथःकरण आणि त्यातून निष्कर्ष काढणे याकडे राहील. त्यासाठी संगणकच नव्हे तर मोबाईल किंवा तत्सम यंत्री पुरे होईल.***

कृत्रिम बुद्धिधारक आभासी मानव करण्याचीही चाहूल लागली आहे. बिगबँग नामक महास्फोटातून निर्माण झालेल्या अथांग विश्वाच्या रचनेतील मोहमयी पृथ्वीचे वय तब्बल साडेचार अब्ज वर्षे! या दीर्घ कालखंडात पृथ्वीवरील खडक-मातीने बनलेल्या शिलावरणाचे स्वरूप बदलत गेले, त्याचबरोबर त्याला लपटलेल्या वातावरण आणि जलावरणाचेही! सागरतळ विस्तारण्याच्या प्रक्रियेतून खंड दुरावत गेले. भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखीच्या उद्रेकातून आणि खडकांची झीज होण्यातून भूरुपे बदलत गेली. या नैसर्गिक आपत्तींमध्ये भर पडत गेली, केवळ साठ हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या मानवाच्या करणीची आणि त्यातून होणाऱ्या पर्यावरणाच्या अपरिमित हानीची!

विसाव्या शतकाच्या मध्यावर मानवाने साधलेली प्रगती संथ गतीने, निसर्ग नियमांना धरून होती. मात्र आज लोकसंख्येच्या विस्फोटात, औद्योगीकरण-शहरीकरण- व्यवसायिकरणाच्या रेट्यात जेसीबी, बुलडोझर, टनेल मेकिंग अशा तंत्रज्ञानाधिष्ठित यंत्रांच्या सहाय्याने शिलावरणाचे लचके तोडले जात आहेत. भूमातेच्या पृष्ठावर, उदरात आणि सभोवताली उपलब्ध असलेल्या प्रत्येक घटकावर- खडक, मृदा, वाळू, इंधन, खनिजे, धातू, जल आणि वायुवर- ताबा मिळविण्याची मानवी वृत्ती बळावत जात आहे. त्यात भर पडणार जल, वायू आणि मृदा प्रदूषणाची. त्यातून त्यांची उपलब्धता कमी होत जाणार आणि शेताच्या बांधापासून ते देशांच्या सीमांपर्यंत संघर्ष आणि त्यातून सभोवतालच्या आवरणांवर ताबा मिळविण्याची वृत्ती बळावणार. त्यातून सौर ऊर्जा पॅनल्स, पवनचक्क्या, अणुऊर्जा क्षेपणास्त्रे, सागरी खारे पाणी गोडे करण्याचे प्रकल्प ठिकठिकाणी आकार घेणार. त्याचबरोबर "टुडेज वेस्ट इज टुमॉरोज रिसोर्स" ही संकल्पना विकसित होत पुनर्वापरावरही मानवाचे लक्ष केंद्रित होणार. कुतुहलाचा वेध घेणे ही मानवी प्रवृत्ती.

एकेकाळी अशक्य वाटणारे मानवाचे पाऊल चंद्रावर पडले.

# सुवर्णमध्य कसा साधेल?




एकेकाळी मध्यमवर्ग हा समाजामध्ये मूल्ये जपणारा वर्ग म्हणून ओळखला जायचा. आता मात्र ही ओळखही पुसली जात आहे की काय, अशी स्थिती येते आहे. उत्पन्न वाढविण्याच्या नादात सामाजिक आणि कौटुंबिक मूल्यांना मूठमाती दिली जात आहे की काय, असे चित्र आहे. समाजाला या दोन्हींचा सुवर्णमध्य गाठण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे लागतील. अन्यथा, पैसे असणाऱ्यांचा मुर्दाड समाज या स्थितीकडे आपण वेगाने प्रवास करू...

गेल्या वीस वर्षांत भारतातील मध्यमवर्गीयांची संख्या दुप्पट झाल्याची बातमी याच आठवड्यात आली. दरवर्षी मिळणाऱ्या कौटुंबिक आकडेवारीवर ही संख्या ठरते. वीस वर्षांपूर्वी म्हणजे सन २००४ मध्ये भारतात पाच ते तीस लाख रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या १४ टक्के होती. आता ती ३१ टक्के झाली आहे. दुपटीहून थोडी अधिकच वाढ आहे ही. त्याचबरोबर अजून २५ वर्षांनी म्हणजे स्वातंत्र्याच्या शताब्दीत भारतामध्ये सुमारे ६३ टक्के कुटुंबे मध्यमवर्गात मोडतील, असा अंदाज आहे. सरासरी सव्वा लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असलेले गरीब गटात, सव्वा ते पाच लाख रुपयांच्यामध्ये उत्पन्न असणारे कनिष्ठ मध्यमवर्गीय, पाच ते तीस लाख रुपये उत्पन्न असणारे मध्यमवर्गीय आणि तीस लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणारे हे श्रीमंत वर्गात मोजले जातात. त्याच्याबरोबर जाहीर झालेले इतर निष्कर्षही बरेच काही सांगतात. गेल्या २६ वर्षांत अतिश्रीमंतांच्या संख्येत अठरापट वाढ झाली. त्या तुलनेत मध्यमवर्गीयांमधील वाढ कमी आहे. श्रीमंत आणि अतिश्रीमंतांची संख्या सर्वाधिक असलेले राज्य आहे ते म्हणजे महाराष्ट्र. सुमारे साडेसहा लाख श्रीमंत लोक महाराष्ट्रात राहतात. त्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न हे दोन कोटी रुपयांच्या वर आहे. दिल्लीत एक लाख ८० हजार तर गुजरातमध्ये एक लाख ४१ हजार अतिश्रीमंत राहतात. या अतिश्रीमंतांची संख्या वाढणाऱ्या शहरांत सुरत आणि नागपूर ही दोन आघाडीची शहरे आहेत. ही आकडेवारी नोंदवितानाच त्यांच्या सवयींची आकडेवारीही नोंदविली गेली आहे. त्यानुसार,



३० लाख रुपये उत्पन्न असणाऱ्यांकडे प्रत्येक घरात मोटार आणि वातानुकूलन यंत्रणा आहेच. उच्च मध्यमवर्गीयांपैकी तीस टक्के जणांकडे मोटारी आहेत. भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर मोठ्या प्रमाणात मध्यमवर्गामध्ये झालेली वाढ आता स्पष्ट दिसू लागली आहे. अर्थात, ही सगळी आकडेवारी ही ढोबळमानाने व कर भरणाऱ्यांच्या किंवा आपले उत्पन्न काही ना काही कारणाने जाहीर करणाऱ्यांच्या आकडेवारीवरून तयार केलेली आहे. त्यामध्ये मोठे उत्पन्न मिळविणाऱ्या पण करप्रणालीपासून लपून राहणाऱ्यांचा समावेश नाही. त्याचप्रमाणे खूपच गरीब असल्याने या सर्वच गोष्टींपासून लांब असणाऱ्यांची नोंद त्यामध्ये झालेली नसणार. असे असले तरीही उत्पन्नामध्ये होत असलेली वाढ ही ठळकपणे नोंदली गेली आहे. आत्ता जे उच्च किंवा मध्यमवर्गीय आहेत; त्यांची ३०-४० वर्षांपूर्वीची स्थिती आपल्यातील बहुतेकांना माहिती आहे. अनेक बाबतीत आपण सगळे सरकारवर अवलंबून होतो. रेशनचे धान्य, रेशनचे कापड याच्याबरोबरच सरकारी शाळेत शिक्षण, शक्यतो सरकारीच नोकरी येथपर्यंतचा तो प्रवास होता. मात्र, नव्या शतकात ते चित्र बदललेले दिसते. आता वर नमूद केलेल्या चारही गोष्टी जवळपास संपुष्टात आल्या आहेत. रेशनवरील धान्य, कापड हे आता मध्यमवर्गीयांच्या नव्या पिढीला माहितीही नाही. इतकेच नव्हे, तर सरकारी शाळेतील शिक्षण व सरकारी नोकरीसाठी प्रयत्न हेदेखील त्यांच्या कक्षेबाहेरचे विषय आहेत. गेल्या २५ वर्षांमध्ये झालेला हा ठळक प्रवास आहे.

# शेतकऱ्यासाठी हवा आहे उमेदीचा पेरा..

**महिला उद्योजिका होताना येतात ते काही अडथळे आणि पेलावी लागतात काही आव्हाने. हिलरी क्लिंटन म्हणतात, की 'कोणतीही टीका गांभीर्याने घ्या; पण वैयक्तिक नको- कारण टीकेमधील सत्यता आणि अचूकपणा तपासणे गरजेचे आहे, अन्यथा तिच्याकडे दुर्लक्ष करणेच बरे!**

आणि म्हणूनच प्रत्येक महिलेला (उद्योजिकेला) येणाऱ्या अडचणी; तसेच आव्हाने नीट समजून घेतल्यास त्याला खंबीरपणे सामोरे जाण्याची क्षमता विकसित करता येईल. नेहमीचेच उद्योग म्हणजे ब्युटीपार्लर, खाद्यपदार्थ; तसेच साड्या, आर्टिफिशियल ज्वेलरी अथवा एखादे बुटीक यांच्या पलीकडे जाऊनही विचार करता येईल. जरा सा हटके!

1) लिंगभावविषयक पूर्वग्रह

तरुण महिला उद्योजिकेला लिंगभावविषयक पूर्वग्रहांना तोंड द्यावे लागते. त्यांना गंभीरपणे घेतले जात नाही. गुंतवणूकदार, ग्राहक किंवा त्यांचे स्वतःचेच कामगारही, 'ही स्त्री आहे, व्यवसायास लागणारे कष्ट हिला झेपतील का? व्यवसाय वाढवत असताना ठीकठिकाणी करावा लागणारा प्रवास, अनियमित दिनक्रम; तसेच भरपूर वेळ देता येईल का?' या प्रकारचे संशय व्यक्त करतात.



2) नेटवर्किंग

विविध संस्था, व्यवसायास आवश्यक तज्ज्ञ मार्गदर्शक; तसेच सरकारी योजनांचे पाठबळ या सर्वांचे नेटवर्क आपला व्यवसाय वाढविण्यास आवश्यक आहे. हे व्यवसायिक जाळे समृद्ध नसल्यास आवश्यक रिसोर्सेस उपलब्ध करणे कठीण होते.

3) कौटुंबिक जबाबदाऱ्या

महिला उद्योजिका एकाच वेळी अनेक भूमिका पार पाडत असते. घरातील लहान मुले, वडीलधारी मंडळी यांचे शारीरिक; तसेच मानसिक संतुलन साधत तिला रोजच तारेवरची कसरत करावी लागते. अनेक ठिकाणी विशेषतः ग्रामीण भागात समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन संकुचित प्रवृत्तीचा असतो. स्त्रीने कसे जगावे, काय करावे, काय करू नये या सर्वांचे ठोकताळे पिढ्यान् पिढ्या ठरलेले आहेत.

४) असमान संधी

अनेक क्षेत्रांमध्ये एखादी संधी महिलेला द्यावी की नाही, हे तिच्या सद्य परिस्थितीवरून ठरविले जाते. उदाहरणार्थ, नुकतेच लग्न झाले असल्यास, लगेच वर्षा-दोन वर्षांत गरोदरपण आणि मग बाळाचा जन्म, त्यातून निर्माण होणाऱ्या पुढील जबाबदाऱ्या या सर्वांमुळे व्यवसायाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता; तसेच मोठी गॅप निर्माण होण्याची भीती, अशा प्रकारच्या कारणांमुळे तिच्या व्यवसायात गुंतवणूक करावी की नाही यावरही विचार केला जातो. सर्वात महत्त्वाचा तो आत्मविश्वास! कधी तो महिला उद्योजिकेला कमी असतो, तर कधी उगाचच जास्त फुगलेला.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शेतकऱ्यांच्या लाँगमार्चला यश!

## आंदोलनकांच्या सर्व मागण्या सरकारकडून मान्य

| मुंबई | महाईन्यूज |

**अखिल भारतीय किसान सभेचे शेतकरी शिष्टमंडळ आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातील बैठक यशस्वी ठरली आहे. शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्याची माहिती आहे. उद्या शेतकरी मोर्चा माघारी घेण्याची शक्यता आहे. दोन ते तीन तासांच्या बैठकीनंतर तोडगा निघाला आहे. काही मागण्या विचारधीन आहेत. जोपर्यंत अंमलबजावणी सुरू होत नाही तोपर्यंत मोर्चा तूर्तास त्याच ठिकाणी मुक्कामी राहणार असल्याचे कॉम्रेड जीवा पांडू गावित यांनी मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीनंतर सांगितलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीनंतर शेतकऱ्यांनी लाँग मार्च आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले आहे.**



शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळामध्ये अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक ढवळे, माजी आमदार कॉम्रेड जे. पी. गावित, किसान सभेचे राज्य सरचिटणीस अजित नवले, माकपचे आमदार विनोद निकोले, किसान सभेचे नेते आणि माकपचे राज्य सचिव कॉम्रेड उदय नारकर, 'सीटू'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी. एल कराड हे प्रमुख नेते बैठकीला उपस्थित होते

शेतकऱ्यांच्या बहुतेक मागण्या मान्य झाल्या आहेत, अशी माहिती कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी एबीपी माझाला दिली. शुक्रवारी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेतकऱ्यांच्या मोर्चाबाबत आणि त्यांच्या मागण्यांबाबत विधानसभा आणि विधान परिषदेत निवेदन करणार आहेत, असेही सत्तार यांनी सांगितलं. शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या असल्याच्या माहितीला आमदार विनोद निकोले यांनी दुजोरा दिला. किसान सभेच्या शिष्टमंडळाची आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली. शिष्टमंडळामध्ये 14 जणांचा समावेश करण्यात आला होता. आपल्या विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात हजारो शेतकऱ्यांनी नाशिकपासून लाँग मार्च काढत मुंबईकडे आले होते. सध्या शेतकऱ्यांचा हा मोर्चा ठाण्यात आलेला आहे. मागण्या मान्य झाल्यामुळे उद्या मोर्चा माघारी घेण्यात येणार असल्याचे समजतेय.

माजी आमदार जीवा पांडू गावित यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी शिष्टमंडळाने आज विधानभवनात मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, कृषीमंत्री अब्दुल सत्तार, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, बंदरे व खनीकर्म मंत्री दादा भुसे, सहकार मंत्री अतुल सावे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, शेतकरी शिष्टमंडळातील डॉ. अशोक ढवळे, विनोद निकोले, इंद्रजीत गावित, अजित नवले, उमेश देशमुख, डी. एल. कराड यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत परंपरागत पद्धतीने आदिवासी कसत असलेल्या जमिनी, वनहक्क दावे, कांद्याचा प्रश्न, वनांमधील अतिक्रमणे, गायरान जमिनी, शेतकऱ्यांना बारा तास वीज, शेती विषयक कर्ज आदी विविध मुद्यांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

### उद्या मुख्यमंत्री निवेदन देणार

**लाँग मार्च बाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. या भेटीनंतर शेतकऱ्यांशी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली असल्याचे या भेटीनंतर एकनाथ शिंदे यांनी सांगितले.**

### लाँगमार्च आंदोलन थांबविण्याचे यांचे आवाहन

. राज्यातील शेतकरी, आदिवासी बांधवांच्या मागण्यांसंदर्भात राज्य शासन सकारात्मक असून आज शेतकरी लाँग मार्चच्या शिष्टमंडळाबरोबर सर्व मुद्दांवर सकारात्मक चर्चा झाली आहे. यासंदर्भात विधीमंडळाच्या सभागृहात निवदनाद्वारे माहिती देण्यात येईल. लाँगमार्च आंदोलन थांबविण्यात यावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

### तोपर्यंत माघार नाही

**शेतकऱ्यांचा मोर्चा तूर्तास वाशिंद येथेच थांबणार आहे. जोपर्यंत मागण्यांवर अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत मोर्चातून माघारी जाणार नाही. मागील मोर्चाचा अनुभव आहे, आश्वासन दिले जाते. मात्र अंमलबजावणी केली जात नाही. यावेळी आश्वासनाची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत माघार नाही. अधिवेशन होईपर्यंत आम्ही सरकारला मुदत दिली आहे, असे किसान सभेचे गावित म्हणाले.**

---

# सत्तासंघर्षाचा निकाल ठेवला राखून

## सर्वोच्च न्यायालयातील शिंदे - ठाकरे गटाचा युक्तिवाद संपला

| मुंबई | महाईन्यूज |

**राज्याच्या सत्तासंघर्षावरील गत नऊ महिण्यांपासून सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या दोन्ही गटाचा युक्तिवाद आज संपला. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची प्रतीक्षा असून हा निकाल घटनापीठाने राखून ठेवला आहे.**

तत्पूर्वी आज शिंदे आणि ठाकरे गटाच्या वकीलांचे युक्तिवाद पूर्ण झाले आहेत. आता राज्याच्या राजकीय भवितव्य काय असेल याचीच उत्सुकता सर्वांना लागली आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीत सत्तासंघर्षात राज्यपालांनी घेतलेल्या भूमिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी कडक शब्दांत ताशेरे ओढले होते. तसेच, कपिल सिब्बल यांनीही राज्यपालांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

केवळ एका पक्षातून आमदार



फुटले म्हणून राज्यपाल थेट बहुमत चाचणीचे आदेश देऊ शकत नाही. पक्षातून केवळ एक गट वेगळा झाला म्हणून राज्यपाल बहुमत चाचणीचे आदेश देऊ शकत नाही. कारण आघाडी ही पक्षांमध्ये होती. महाराष्ट्रात आघाडीचे सरकार होते. गटांचे नव्हे.

### ॲड. कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद

**विधानसभा अध्यक्षांच्या अनुपस्थित उपाध्यक्ष काम करतात. त्यांचे काम घटनाबाह्य होते, असे म्हणणे चुकीचे.**
**आमदारांविरोधातील अपात्रतेची कारवाई आणि अविश्वास प्रस्ताव या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. कोणत्याही स्थितीत अपात्रतेची कारवाई थांबवता येत नाही. राज्यपाल फक्त राजकीय पक्षांशी चर्चा करू शकतात. गटाशी नाही. राज्यपालांनी चुकीच्या पद्धतीने बहुमत चाचणी बोलावली.**
**बंडखोर 34 आमदारांनाच राज्यपालांनी शिवसेना गृहीत धरले.**
**राज्यपालांनी कोणत्या घटनात्मक अधिकारात बहुमत चाचणी बोलावली?**
**फुटलेला एक गट म्हणजे राजकीय पक्ष नाही. तरीही राज्यपालांनी त्यांना बहुमत चाचणीसाठी बोलावले. त्यामुळेच नबाम रेबिया केस चुकीची.**
**राजकीय पक्ष कोण, हे निवडणूक आयोग ठरवते. गट स्वतःला पक्ष म्हणू शकत नाही. राजकीय पक्ष हा मूळ गाभा**
**राजकीय पक्षाच्या चिन्हावर आमदार निवडून येतात. वैयक्तिक क्षमतेवर नाही.**
**घटनेत गटाला मान्यता नाही. फुटलेला एक गट म्हणजे राजकीय पक्ष नाही. राजकीय पक्ष हाच मूळ गाभा.**
**राजकीय आणि विधिमंडळ पक्षामध्ये राजकीय पक्षालाच प्राधान्य. राज्यपाल पक्षालाच चर्चेसाठी बोलावू शकतात.**

# अमृता फडणवीस फसवणूक प्रकरण: अनिल जयसिंघानींच्या मुलाला पोलिसांनी घेतलं ताब्यात

| मुंबई | महाईन्यूज |

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस या पेशाने बँकर असून उत्तम गायिकाही आहेत.

मुंबई पोलिसांनी गुरूवारी अक्षन जयसिंघानीला अटक केली आहे. अक्षन जयसिंघानी हा बुकी अनिल जयसिंघानींचा मुलगा आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांना फसवणूक प्रकरणात अक्षनला ताब्यात घेण्यात आलं आहे. लाच देण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी डिझायनर अनिक्षाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात प्रतिक्रिया दिली आहे. मला अडचणीत आणण्यासाठी हा ट्रॅप होता असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

अनिल जयसिंघानी यांची मुलगी अनिक्षाच्या विरोधातही मलबार हिल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात



आला आहे. अमृता फडणवीस यांचा विश्वास संपादन करून अनिक्षाने त्यांना लाच देण्याचा प्रयत्न केला. त्याच प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. अनिक्षा सुमारे १६ महिने अमृता फडणवीस यांच्या संपर्कात होती तसंच अनिक्षा अमृता फडणवीस यांच्या घरीही गेली होती. अनिक्षा आणि माझी पहिली भेट नोव्हेंबर २०२१ मध्ये झाल्याचं अमृता फडणवीस यांनी म्हटलं आहे. अमृता फडणवीस यांच्यावर दबाव आणून माझ्या माध्यमातून काही कामे करण्यासाठी प्रयत्न झाला आहे. पहिल्यांदा पैशांची ऑफर देण्यात आली. त्यानंतर ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला.

# आजपासून पुढील पाच दिवस
# विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा

## » शेतकऱ्यांवर मोठं संकट कोसळलं, शेतकरी चिंतेत





| नवी दिल्ली | महाईन्यूज |

**देशातील हवामानामध्ये सध्या मोठा बदल झाल्याचं चित्र आहे. कुठे ऊन तर कुठे पाऊस अशी परिस्थिती आहे. काही ठिकाणी उन्हाचा पारा घसरला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवसांत देशातील अनेक भागांत विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अनेक भागांत 20 मार्चपर्यंत तुरळक पावसाच्या सरी तर काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, अवकाळी पावसामुळे अनेक भागांत पिकांचं नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांवर मोठं संकट कोसळलं आहे.**

### पुढील पाच दिवस पावसाची शक्यता

आजपासून पुढील पाच दिवस म्हणजेच 16 ते 20 मार्च या काळात पूर्व भारत, वायव्य भारतासह पश्चिम हिमालयीन प्रदेशात हलका ते मध्यम पाऊस, ढगांचा गडगडाट आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार, पुढील 10 दिवसांत मध्य, उत्तर आणि पश्चिम भागात मुसळधार पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिकांचं नुकसान होऊन उत्पादनांवरदेखील परिणाम होईल.

### अवकाळी पावसाची शेतीला फटका

हवामानात सातत्याने बदल होत आहेत. दुपारी कुठे उन्हाचा चटका जाणवत आहे तर कुठे ढगाळ वातावरण पाहायला मिळत आहे. याचा शेती पिकांना फटका बसत आहे. अनेक राज्यांमध्ये हाती आलेल्या पिकांची नासाडी झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजामुळे राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत. सध्या शेतीपिकांची काढणी सुरु आहे. अशातच पाऊस किंवा गारपीट झाल्यास पिकांचं नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर अवकाळी पावसाचं संकट घोंघावत आहे.

### 'या' राज्यांमध्ये पावसाची शक्यता

»हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. 16 ते 19 मार्च 2023 या कालावधीत विविध भागात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने अनेक ठिकाणी येलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या अनेक भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि पर्वतीय प्रदेशासह अनेक भागांसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### डोंगराळ भागांत वादळी वाऱ्यांसह पाऊस

» तेलंगणा, छत्तीसगड, झारखंड आणि मध्य प्रदेशमध्ये 16 ते 19 मार्च दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या पर्वतीय भागांमध्ये पावसासह जोरदार वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. दरम्यान, 17 ते 19 मार्च दरम्यान पंजाब, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये पाऊस विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# साई रिसॉर्ट प्रकरणी मोठी कारवाई!

## » सदानंद कदमांनंतर तिसरी अटक

| दापोली |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**येथील साई रिसोर्ट प्रकरणी कडक कारवाई सुरुच आहे. या प्रकरणी ईडीने अनिल परब यांचे निकटवर्तीय सदानंद कदम यांना अटक केली त्यापाठोपाठ दापोली साई रिसॉर्ट प्रकरणात तत्कालीन प्रांताधिकारी जयराम देशपांडे यांना ईडीकडून अटक करण्यात आली होती.**

साई रिसॉर्टच्या कामासाठी बेकायदेशीर परवानगी दिल्याचा ठपका जयराम देशपांडे यांच्यावर ठेवण्यात आला. त्यानंतर आज या प्रकरणातील तिसरी अटक करण्यात आली आहे. बीडीओने दिलेल्या तक्रारीनुसार सुधीर पारदुले यांना अटक करण्यात आली आहे.

सुधीर पारदुले हे मंडळ अधिकारी आहेत. तर त्यांना दापोली पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. याप्रकरणात अनिल परब यांच्यावर देखील अटकेची टांगती तलवार असल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलेली.

दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात ईडीने कारवाईचा धडाका लावला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीमधील साई रिसॉर्टचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. साई रिसॉर्ट हे अनिल परब यांचं नसून रामदास कदम यांचे भाऊ सदानंद कदम यांचं असल्याचा गौप्यस्फोट जानेवारी महिन्यात एका राजकीय पक्षाच्या माजी आमदाराने केला होता.

साई रिसॉर्टच्या बेकायदा बांधकामाचं प्रकरण राज्यातील राजकीय वर्तुळात गेल्या अनेक दिवसांपासून गाजत आहे. या प्रकरणात याआधी अनिल परब यांचंही नाव आलं होतं. किरीट सोमय्या यांनी हे प्रकरण उचलून धरत अनेक ठिकाणी तक्रारी केल्या होत्या. यात अनिल परब यांची चौकशीही करण्यात आली होती.

साई रिसॉर्ट प्रकरणात सदानंद कदम यांनी याआधीच उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

### ईडीने लावला कारवाईचा धडाका



» दापोलीतील साई रिसॉर्ट प्रकरणात आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीमधील साई रिसॉर्टचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. साई रिसॉर्ट हे अनिल परब यांचं नसून रामदास कदम यांचे भाऊ सदानंद कदम यांचं असल्याचा गौप्यस्फोट जानेवारी महिन्यात एका राजकीय पक्षाच्या माजी आमदाराने केला होता.

# राज्यात पुन्हा मास्कसक्ती होणार?

## » मुख्यमंत्र्यांनी बोलावली तातडीची बैठक

| मुंबई |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**राज्यातला कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असतानाच आता H3N2 विषाणूचा धोका वाढला आहे. या विषाणूमुळे दोघांचा मृत्यूही झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांची आज आरोग्य विभागाची बैठक बोलावली आहे. यामध्ये मास्कसक्ती विषयीचाही निर्णय होण्याची शक्यता आहे.**



सध्या राज्यातच नव्हे, तर देशभरात H3N2 चा संसर्ग वाढताना दिसत आहे. मुंबई पुण्यासह राज्यातल्या काही मोठ्या शहरांमध्ये या विषाणूचे रुग्ण वाढत आहेत. मार्च महिन्यातल्या पहिल्या १५ दिवसांमध्ये मुंबईत या विषाणूचे ५३ रुग्ण आढळले आहेत. तर दोन रुग्णांचा मृत्यूही झाला आहे. यातला एक रुग्ण अहमदनगरचा तर दुसरा नागपूर इथला आहे.

त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आरोग्य विभागाची तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीमध्ये मास्कसक्तीबद्दलचा निर्णय होण्याची शक्यता आहे. आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी या पार्श्वभूमीवर नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन केलं आहे. आपण राज्यातल्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत, अशी माहितीही सावंत यांनी दिली आहे. तसंच आजार अंगावर काढू नका, खबरदारी घ्या, मास्क वापरा, असं आवाहनही त्यांनी नागरिकांना केलं आहे.



# “भारतातल्या मुली आळशी” : सोनाली कुलकर्णीने मांडलं स्पष्ट मत

अभिनेत्री सोनाली कुलकर्णी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. ती अनेक कार्यक्रमांना हजेरी लावत असते. ती तिची मतं स्पष्टपणे मांडत असते. सोनाली कुलकर्णीने अलीकडेच एका कार्यक्रमात हजेरी लावली. या कार्यक्रमातील तिचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये लग्नासाठी मुलगा शोधताना मुलींच्या अपेक्षा किती जास्त व अवाजवी असतात, याबद्दल ती बोलत आहे.सोनाली कुलकर्णी तिच्या व्हिडीओमध्ये म्हणते, “भारतात खूप साऱ्या मुली आळशी आहेत. त्यांना असा पती किंवा बॉयफ्रेंड हवा असतो, ज्याच्याकडे चांगली नोकरी, घर असेल, पगार वाढण्याची खात्री असेल. पण त्या मुलीत इतकी हिंमत नसते की ती एखाद्या मुलाला म्हणू शकेल की तू माझ्याशी लग्न केल्यावर मी काय करेन.”

पुढे ती सर्वांना आवाहन करत म्हणाली, “तुमच्या घरात अशी स्त्री निर्माण करा, जी स्वतःसाठी कमवू शकेल. जी घरात सामान घ्यायचं असेल तर पतीला अर्धे पैसे देऊ शकेल. मला त्यांनी घरात भांडणं करावीत असं म्हणायचं नाही, पण महिला तितकी सक्षम असावी.” यावेळी तिने एका मैत्रिणीचा किस्सा सांगितला. मैत्रीण लग्नासाठी मुलगा शोधत होती आणि ५० हजारांपेक्षा कमी पगाराचा मुलगा नकोच, एकटा राहत असेल तर खूपच उत्तम, सासू सासरेही नको आणि त्याच्याकडे कार असावी, असं तिचं म्हणणं होतं. मी तिला



म्हटलं की तू काय मॉलमध्ये आली आहेस का? तुला मुलगा हवाय की ऑफर हवी आहे. हे खरंच खूप अपमानास्पद आहे,” असं मत सोनालीने मांडलं.

“मुलं १८ वर्षांची झाल्यावर त्यांना पैसे कमावण्याचा दबाव असतो. कुटुंबाला हातभार लावण्याची जबाबदारी येते. हे पाहून मला माझ्या या भावांसाठी रडायला येतं. माझा नवरा २० व्या वर्षी नोकरीला लागला आणि पैसे कमवू लागला. का? मुली तर २५-२७ वर्षांच्या होईपर्यंत फक्त विचारच करत असतात. तरी हनिमून भारतात नको परदेशात हवं, असा त्यांचा हट्ट असतो.





# शिवानीने विराजसला कोणता धडा शिकवला

अभिनेत्री शिवानी रांगोळे ही छोट्या पडद्यावरील एक लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखले जाते. मध्यंतरीच्या काळात ती छोट्या पडद्यापासून दूर होती. पण आता ती नुकत्याच सुरू झालेल्या ‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ या मालिकेत शिवानी प्रमुख भूमिकेत दिसत आहे. अक्षरा असं तिच्या व्यक्तीरेखेचं नाव आहे. सध्या या मालिकेची आणि तिच्या भूमिकेची खूप चर्चा आहे. यानिमित्ताने सध्या ती अनेक मुलाखती देत आहे. तर आता तिने आणि तिचा नवरा विराजस कुलकर्णीने एक मुलाखत दिली त्यात शिवानीने विराजसला कोणता धडा शिकवला आहे याचं शिवानीने उत्तर दिलं आहे.शिवानी रांगोळे आणि विराजस कुलकर्णी हे मराठी मनोरंजन सृष्टीतील एक लोकप्रिय कपल आहे. गेल्या वर्षी ३ मे रोजी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर त्यांनी लग्नगाठ बांधली. त्यांच्यातलं बॉण्डिंग आणि त्यांची केमिस्ट्री सर्वांनाच खूप आवडते. आता “शिवानीने तुला आतापर्यंत कोणता धडा शिकवला का?” असा प्रश्न विराजसला ‘मज्जा’ यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत विचारण्यात आल्यावर शिवानी व विराजस यांनी मिळून याचं उत्तर दिलं.विराजस म्हणाला, “मी म्हणूनच तिला म्हटलं की तू ही भूमिका स्वीकार म्हणजे जे काही धडे शिकवायचे ते तू मालिकेतल्या नवऱ्याला शिकवशील आणि घरी आल्यावर फक्त लाड करता येतील.” तर शिवानी गमतीत म्हणाली, “मी अख्ख लग्न केलं आहे त्याच्याबरोबर.. आता याहून मोठा काय धडा असणार.” तर त्यावर विराजस म्हणाला, “जोपर्यंत ती धडे शिकवत आहे तोपर्यंत मला काहीही प्रॉब्लेम नाही. कारण एकमेकांना शिकवणं हे कुठल्याही नात्यात महत्त्वाचं असतं. पण जोपर्यंत ती अद्दल घडवत नाही तोपर्यंत मला काही प्रॉब्लेम नाही.” आता तिचं हे बोलणं खूप चर्चेत आलं असून त्या निमित्ताने पुन्हा एकदा त्यांची केमिस्ट्री आणि त्यांच्यात असलेली मैत्री प्रेक्षकांना पाहायला

# तू ब्रह्मांड सुंदरी... तमन्ना भाटियाच्या फोटोंवर कमेंट्सचा पाऊस




टॉलिवूड आणि बॉलिवूडमध्ये आपल्या अभिनयाची छाप उमटवणारी अभिनेत्री तमन्ना भाटियाच्या अभिनयाचे आणि सौंदर्याचे लाखो चाहते आहेत. तमन्ना चित्रपटांव्यतिरिक्त सोशल मीडियावर देखील सक्रिय असते. सोशल मीडियावर तमन्ना तिचे विविध लूक शेअर करत असते. नुकतंच तमन्नाने एक सुंदर फोटोशूट केलंय. ज्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे.

# प्रशांत दामले आणि संकर्षण कऱ्हाडे पुन्हा गाजवणार!

माणूस हा असा प्राणी आहे की, सामान्यपणे तो कोणत्याही मानवी नियमांत बसत नाही. कालचा माणूस आज वेगळा भासतो. कोणत्या प्रसंगी आपण कसे वागू हे निश्चितपणे सांगता येत नाही. त्यामुळे सांगणे आणि स्वतः वागणे यात फरक पडतो. थोडक्यात काय तर नियम व अटींच्या बाबतीत विचाराच्या, वागण्याच्या बाबतीत ठामच असावे, असा हट्ट अनेकदा चुकीचा ठरतो.

सोयीनुसार नियमातून पळवाट काढताना अटींचा भंग होऊ शकतो. हे माहीत असूनही नियम व अटी लागू केल्या जातात. त्यात जर या नियम व अटी नवरा व बायकोच्या नात्याला लागू करायच्या असतील तर काय? हाच भन्नाट विषय घेऊन प्रशांत दामले निर्मित ‘नियम व अटी लागू’ हे आजच्या पिढीचं खुसखुशीत नाटक रंगभूमीवर येत आहे.गौरी थिएटर निर्मित व प्रशांत दामले फॅन फाउंडेशन प्रकाशित ‘नियम व अटी लागू’ या नव्या नाटकाचा शुभारंभ शनिवार १८ मार्च सावित्रीबाई फुले नाट्यगृह डोंबिवली रात्रौ ८.३० वा. होणार आहे.

नाटकातील नियम व अटींच्या बाबतीत सदैव जागरूक असणारे निर्माते प्रशांत दामले, दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी आणि आपल्या खुमासदार लेखणीने नियम व अटींचा लेखाजोगा मांडणारे युवा लेखक संकर्षण कऱ्हाडे या त्रयीचं हे नाटक आहे. स्वतः संकर्षण कऱ्हाडे अभिनेत्री अमृता देशमुख आणि अभिनेता प्रसाद बर्वे यांच्या प्रमुख भूमिका या नाटकात आहेत.





# नवा गडी, नवं राज्य...

## रोहितच्या मैदानात हार्दिकची अग्नीपरीक्षा, पहिल्या विजयासाठी भारत सज्ज

### हार्दिक पंड्या भारतीय संघाचा कर्णधार

**»शुभमन गिल या लढतीद्वारे आपण वनडेसाठीही ताकदवान सलामीवीर आहोत, हे दाखवून देण्याचा प्रयत्न करेल. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत अहमदाबाद कसोटीतील कामगिरी पुढे सुरु ठेवण्याचे त्याचे लक्ष्य असेल.विराट कोहलीला कसोटीतही गवसलेला सूर ऑस्ट्रेलियाचे दडपण नक्कीच वाढवणार आहे. कुलदीप यादव आणि युझवेंद्रसिंग चहल या लेगस्पिनरनी बुधवारी कसून सराव केला होता. रोहित शर्माने आजच्या सामन्यातून घरगुती कार्यक्रमामुळे माघार घेतली आहे. त्याच्या अनुपस्थितीत टी-२०साठी नेतृत्त्व करणारा हार्दिक पंड्या भारतीय संघाचा कर्णधार असेल.**

**।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या वनडे वर्ल्ड कप क्रिकेट स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका भारतीय संघासाठी महत्त्वाची मानली जात आहे, पण गोलंदाजांचे वर्चस्व राहिलेली कसोटी मालिका आणि आयपीएल यांच्या दरम्यान होणाऱ्या वनडे मालिकेकडे प्रतिस्पर्धी संघ वर्ल्ड कपची पूर्वतयारी म्हणूननक्कीच बघत आहेत. हार्दिक पंड्याला आज ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या पहिल्या लढतीद्वारे वनडे नेतृत्वासाठीही आपण तयार आहोत, हे दाखवण्याची संधी आहे.

गावस्कर-बॉर्डर मालिकेनंतर भारत आणि ऑस्ट्रेलिया या प्रतिस्पर्धी संघांना कसोटी जगज्जेतेपद लढतीचे वेध लागले आहेत. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियासही भारतातील वर्ल्ड कपच्या दृष्टीने आपली पूर्वतयारी जाणून घ्यायची आहे. भारतीय संघाचा त्यांच्या घरच्या मैदानावर सामना करण्यासारखी चांगली पूर्वतयारी नसेल, हे ऑस्ट्रेलिया संघ जाणून आहे. आयसीसीच्या स्पर्धात भारतीय संघ बाद फेरीच्या लढतीत अपयशी ठरतो, पण थेट मालिकांत सरस असतो. श्रीलंका आणि न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेतील धवल यश कायम ठेवण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल. शुभमन गिल या लढतीद्वारे आपण वनडेसाठीही ताकदवान सलामीवीर आहोत, हे दाखवून देण्याचा प्रयत्न करेल. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत अहमदाबाद कसोटीतील कामगिरी पुढे सुरु ठेवण्याचे त्याचे लक्ष्य असेल.विराट कोहलीला कसोटीतही गवसलेला सूर ऑस्ट्रेलियाचे दडपण नक्कीच वाढवणार आहे. कुलदीप यादव आणि युझवेंद्रसिंग चहल या लेगस्पिनरनी बुधवारी कसून सराव केला होता. रोहित शर्माने आजच्या सामन्यातून घरगुती कार्यक्रमामुळे माघार घेतली आहे. त्याच्या अनुपस्थितीत टी-२०साठी नेतृत्त्व करणारा हार्दिक पंड्या भारतीय संघाचा कर्णधार असेल.

पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड संघात नाहीत. मिशेल मार्श केवळ फलंदाज म्हणून खेळणार आहे. डेव्हिड वॉर्नर खेळण्याबाबत साशंकता आहे. यानंतरही पाचवेळा वर्ल्ड कप वनडे स्पर्धा जिंकलेल्या ऑस्ट्रेलियास कमी लेखण्याची चुक करता येणार नाही. भारत दौऱ्यावर न्यूझीलंडचा दुय्यम संघच आला होता, तर श्रीलंकेची ताकद कमी झाली आहे. त्यामुळे काही महिन्यांत प्रथमच भारतीय संघांची वनडे मालिकेत कस पणास लागणार आहे. ऑस्ट्रेलियासमोर वेगळाच प्रश्न आहे. ते नोव्हेंबरपासून एकही वनडे खेळलेले नाहीत. ॲरॉन फिंचच्या निवृत्तीनंतर त्यांचा मर्यादित षटकांसाठी संघ अजून पूर्ण स्थिरावलेला नाही. ट्रॅव्हिस हेडने इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेत दीडशतकी खेळी केली होती. भारतातील कसोटीतही त्याने सलामीवीरांची जागी चांगली भरून काढली आहे. आता तो वनडेमध्येही मुख्य आधारस्तंभ असेल आणि हो ग्लेन मॅक्सवेल परतला आहे, हे कसे विसरता येईल.

# बाबर आझमचा टी-२० ख्रिस गेलचा 'हा' विक्रम मोडला

## » बाबर आझम टी क्रिकेटच्या इतिहासात सर्वात जलद नऊ हजार धावा करणारा फलंदाज

**। इस्लामाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

सध्या पाकिस्तानमध्ये पाकिस्तान सुपर लीग २०२३ या स्पर्धेचा थरार सुरु आहे. या स्पर्धेतील प्लेऑफचा सामना इस्लामाबाद युनायटेडविरुद्ध पेशावर झाल्मी संघात खेळला गेला. या सामन्यात पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम आपल्या कारकिर्दीत एकापाठोपाठ एक विक्रम करत आहे. शुक्रवारी त्याने शानदार फलंदाजी करताना आणखी एक विक्रम केला. तो टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वात जलद ९००० धावा करणारा फलंदाज ठरला आहे.

विराट कोहली तिसऱ्या स्थानावर –

बाबर आणि गेलनंतर विराट कोहली २७१, डेव्हिड वॉर्नर २७३ आणि ॲरॉन फिंच हे २८१ डावात नऊ हजार धावा पूर्ण करणारे फलंदाज आहेत. बाबरने २०१९ पासून सर्वाधिक टी-२० शतके झळकावली आहेत. त्याच्या नावावर ८ शतके आहेत. या यादीतील पुढचा फलंदाज जोस बटलर आहे, ज्याने ६ शतके झळकावली आहेत. युनायटेडविरुद्धच्या ३९ चेंडूंच्या खेळीत झाल्मीच्या कर्णधाराने १० चौकार मारले. युनायटेडचा कर्णधार शादाब खानने त्याला १३व्या षटकात पायचित बाद केले.

या प्लेऑफच्या सामन्यात पेशावर झाल्मीने २० षटकात ८ गडी गमावून १८३ धावा केल्या. बाबरच्या ६४ सोबतच मोहम्मद हरिसने ३४, सॅम अय्युबने २३, हसिबुल्ला खानने १५, टॉम कॅडमोरने १६ आणि अजमातुल्लाहने १० धावांचे योगदान दिले. युनायटेडचा कर्णधार शादाब खानने ४ षटकात ४० धावा देत २ बळी घेतले.



### ख्रिस गेलचा विक्रम मोडला

**»पीएसएल अंतर्गत गुरुवारी इस्लामाबाद युनायटेडविरुद्ध पेशावर झाल्मीचा सामना पार पडला. या सामन्यात खेळताना पेशावर झाल्मीचा कर्णधार बाबर आझमने ६४ धावांची दमदार खेळी केली. त्याचबरोबर बाबरने एक मोठा विक्रम रचला आहे. त्याने सर्वात जलद नऊ हजार धावा करण्याच्या बाबतीत वेस्ट इंडिजचा अनुभवी फलंदाज ख्रिस गेलचा विक्रम मोडला. वेस्ट इंडिजचा दिग्गज ख्रिस गेलने २४९ डावात ९००० धावा पूर्ण केल्या. बाबरने केवळ २४५ डावात ही कामगिरी केली.**